# Maharashtra Board Class 10 Sanskrit Anand Notes Chapter 5 युग्ममाला

## युग्ममाला Summary in Marathi

प्रस्तावना :

संस्कृत साहित्यात अनेक शब्दयुग्मे (शब्दांच्या जोड्या). उदाहरणार्थ – यदा – तदा, यावत् – तावत्, यत्र – तत्र, इ. आढळतात. वाक्य व श्लोकांमध्ये अशी शब्दयुग्मे वापरल्यास वाक्यांचे व श्लोकांचे सौंदर्य वाढते. जसे- यथा राजा तथा प्रजा। युग्ममाला हा अशा श्लोकांचा संग्रह आहे की जेथे श्लोकाचा अर्थ पूर्ण करण्याकरिता तसेच त्याचे भाषिक सौंदर्य वाढविण्यासाठी शब्दयुग्मांचा वापर केलेला दिसून येतो.

श्लोकः 1

यथा चतुर्भि: कनक परीक्ष्यते निघर्षणच्छेदनतापताडनैः। (वृत्तम् – वंशस्थम्)
तथा चतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते श्रुतेन शीलेन गुणेन कर्मणा ।।1।। (वद्धचाणक्यशतकात्)

अन्वय:- यथा कनक निघर्षण – छेदन – ताप – ताडनैः (इति) चतुर्भिः परीक्ष्यते, तथा पुरुषः श्रुतेन, शीलेन, गुणेन, कर्मणा (इति) चतुर्भिः परीक्ष्यते।

अनुवादः

ज्याप्रमाणे सोन्याची परीक्षा (पारख) घासणे, छेदन करणे (तोडणे), तापविणे व (हातोडीने) ठोकणे, (या) चार प्रकारांनी होते. त्याप्रमाणे, ज्ञान, चारित्र्य, सद्गुण व कर्म या चार प्रकारांनी मनुष्याची परीक्षा होते. स्पष्टीकरण – सोन्याची चकाकी तपासण्याकरिता त्याला घासावे लागते, ते काळे पडते का हे पाहण्याकरिता त्याला तापवावे लागते, त्याचा चिवटपणा पाहण्याकरिता त्याला तोडावे लागते व हातोड्याने ठोकून त्याचा मऊपणा हा गुण कसाला लागतो. थोडक्यात, सोन्याची शुद्धता सिद्ध करण्यासाठी त्याला चार कसोट्या लावतात. त्याप्रमाणे मनुष्य ज्ञानी, सदाचरणी व गुणी राहून त्याचा चांगुलपणा सिद्ध करतो.

श्लोकः 2

यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्पधीरपि। (वृत्तम् – अनुष्टप)
निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ।।2।। (सङ्ग्रहात्।)

अन्वयः- यत्र विद्वज्जनः न अस्ति, तत्र अल्पधी: अपि श्लाघ्यः (भवति)। (यथा) निरस्तपादपे देशे एरण्डः अपि दुमायते।

अनुवादः

जेथे विद्वान नसतो तेथे अल्पबुद्धीचा माणूसही प्रशंसनीय ठरतो. (स्तुतीस पात्र ठरतो.) वृक्षहीन (वैराण) प्रदेशात एरंडही वृक्ष होतो (ठरतो.)

स्पष्टीकरण-दबळया समहावर अंकुश ठवणाऱ्या लाकाना उप्पसून वरील श्लोकाची रचना केली आहे. अल्प क्षमता असलेल्या लोकांच्या समूहामध्ये किचित अधिकतर क्षमता असलेलाही स्तुतीस पात्र ठरतो.।

श्लोकः 3

यदा किञ्जिज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदलिप्तं मम ममः।
यदा किञ्जिकिञ्शिद् बुधजनसकाशादवगतं (वृत्तम् – शिखरिणी)
तदा मूर्योऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ।।3।। (नीतिशतकात)

अन्वय:- यदा अहं किञ्जिजः (रादा) (अहं) द्विपः इव मदान्धः समभवम् । तदा मम मनः 'सर्वज्ञ: अस्मि' इति अवलिप्तम् अभवत्। यदा बुधजनसकाशात् किंचित् किक्षित् अवगतम् तदा (अह) मूर्खः अस्मि (इति ज्ञात्वा) में मद; ज्वर: इव व्यपगतः।

अनुवादः

जेव्हा मला थोडेसे ज्ञान प्राप्त झाले, तेव्हा मदाने आंधळा झालेल्या हत्तीसारखा मी (आंधळा) झालो आणि माझे मन 'मी सर्वज्ञ आहे' या कल्पनेने वेढले गेले. (पण) जेव्हा ज्ञानी माणसांकडून मला थोडे थोडे कळू लागले, तेव्हा मी मूर्ख आहे' असे मला जाणवले व तापाप्रमाणे माझा गर्व नाहीसा झाला (उतरला.)
स्पष्टीकरण – स्वतःच्या ज्ञानाचा कधीही गर्व बाळगू नये कारण ज्ञानी माणसांच्या सहवासाने अल्पज्ञानात भर पडते.

श्लोकः 4

तावद् भवाद्धि भेतव्यं यावद्भयमनागतम्। (वृत्तम् – अनुष्टप)
आगतं तु भयं वीक्ष्य नरः कुर्याद् यथोचितम् ।।4।। (पञ्चतन्त्रात्)

अन्वय:- यावत् भयम् अनागतं तावत् हि भयात् भेतव्यम्। (तथापि) आगतं तु भयं वीक्ष्य नरः यथोचितं कुर्यात्।

अनुवादः

जोपर्यंत भयाने (माणसाला) ग्रासले नाही (संकटात पकडले नाही) तोपर्यंत (माणसाने) भयाला घाबरावे. (परंतु) भयाला आलेले पाहून मनुष्याने जे योग्य आहे तेच आचरावे

श्लोकः 5

उत्तमो नातिवक्ता स्यादधमो बहु भाषते।
सुवर्णे न ध्वनिस्ताद्दग्याद्दक्कांस्ये प्रजायते ।।5।। (वृत्तम् – अनुष्टुप)

अन्वयः- उत्तमः अतिवक्ता न स्यात्, अधम: बहु भाषते। याद्दक् कांस्ये (ध्वनिः) प्रजायते ताद्दक् सुवर्णे ध्वनिः न (प्रजायते)।

अनुवादः

https://www.evidyarthi.in/

उत्तम व्यक्ती फार बोलत नाही (वायफळ गोष्टींमध्ये सहभाग घेत नाही) (बुद्धीने व ज्ञानाने) सामान्य लोक खूप बडबड करतात. ज्याप्रमाणे, काश्याच्या भांड्याचा आवाज होतो तसा सोन्याचा होत नाही.
स्पष्टीकरण: ज्ञानी माणसे वायफळ बोलत नाहीत; ज्यांचे ज्ञान अल्प आहे, अशी माणसे नेहमी बडबड करत राहतात.

श्लोकः 6

यादृशं वपते बीज क्षेत्रमासाद्य कर्षकः।
सुकृते दुष्कृते वाऽपि तादृशं लभते फलम् ।।6।। (वृत्तम् – अनुष्टुप्)

अन्वय:- कर्षक: क्षेत्रम् आसाद्य यादृशं बीजं वपते (तादृशं फलं लभते)। (तथैव मनुष्यः) सुकृते वा दुष्कृते वा अपि तादृश (इष्टम् अनिष्ट वा) फलं लभते।

अनुवादः

शेतकरी शेतात जाऊन ज्या त-हेचे बीज पेरतो, त्या तमेचे फळ त्याला मिळते. कृती चांगली वा वाईट (जशी असेल) त्यानुसार मनुष्यास त्याचे फळ मिळते. (चांगल्या कृतीचे आनंददायी तर वाईट कृतीचे क्लेशकारक फळ मिळते.)
स्पष्टीकरण – पेरावे तसे उगवते.

शब्दार्थाः

1. निघर्षण – rubbing – घर्षण
2. छेदन – cutting – तोडणे
3. ताप – heating – तापवणे
4. कनकम् – gold – सोने
5. शीलेन – by character – चारित्र्याने
6. गुणेन – by virtues – गुणांनी
7. कर्मणा – by deeds – कर्माने
8. श्रुतेन – by learning/ knowledge – ज्ञानाने
9. ताडनैः – by hammering – ठोकून
10. चतुर्भिः – by four (ways) – चार (प्रकारे)
11. परीक्ष्यते – is tested – तपासले जाते
12. यथा – तथा – just as – similarly – ज्याप्रमाणे – त्याप्रमाणे
13. विद्वज्जनः – learned – विद्वान
14. श्लाघ्यः – praiseworthy – स्तुतीस पात्र/प्रशंसनीय
15. एरण्ड : – castor plant – एरंड
16. अल्पधी: – dull-witted person – अल्पबुद्धी असलेला
17. निरस्तपादपे – no tree – वृक्षहीन
18. दुमायते – becomes a tree – वृक्ष मानला जातो
19. यत्र – तत्र – where-there – जेथे – तेथे
20. किञ्चिज्ञ – having scanty knowledge – अल्पज्ञान असलेला
21. मदान्धः – blinded with pride – मदाने आंधळा
22. व्यपगतः – disappeared – नाहीसा झाला

23. द्विपः इव – like an elephant – हतीसारखा
24. ज्वर: इव – like fever – तापासारखा
25. अवलिप्तम् – conceited – बेडले गेले
26. अवगतम् – learnt – समजले
27. बुधजनसकाशात् from learned – ज्ञानी मानसांकडून
28. समभवम् – I became – मी झालो
29. सर्वज्ञः अस्मि – know everything – मी सर्वज्ञ आहे
30. यदा-तदा – when-then – जेव्हा तेव्हा
31. भेतव्यम् – should frighten – घाबरून रहावे
32. अनागतम् – not arrived – आले नाही
33. वीक्ष्य – seeing carefully – काळजीपूर्वक पाहून
34. यथोचितं – should do what is – योग्य ते करावे
35. कुर्यात् – proper
36. यावद्-तावद् – as long as-till then जोपर्यंत – तोपर्यंत
37. उत्तमः – excellent
38. अधमः – inferior
39. कांस्य – bronze
40. उत्तम – अधम काशे
41. प्रजायते – is produced – निर्माण होतो
42. याद्दक् – ताद्दक् – just as-likewise – जसा – तसा
43. न अतिवक्ता स्यात् – does not talk much – जास्त बोलत नाही
44. कर्षक: – farmer – शेतकरी
45. सुकृते – in good or bad – चांगल्या वा
46. दुष्कृते वा – deed – वाईट कृतीमध्ये
47. बीजं वपते – Sows seeds – धान्य पेरतो
48. फलं लभते – obtains a fruit – फळ मिळते
49. क्षेत्रमासाद्य – going to the fields – शेतात जाऊन
50. याद्दशम् – just as – जसे
51. ताद्दशम् – likewise – तसे

https://www.evidyarthi.in/